पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, कौसा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ४६ /२०२६ दि. २५/०२/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, नवी मुंबई वाहतूक विभागाचे हद्दीत दिनांक २८/०२/२०२६ व दिनांक ०१/०३/२०२६ रोजी " हिंद दी चादर " श्री. गुरू तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहिदी समागम कार्यक्रम अनुषंगाने महत्तत्वाच्या व अतिमहत्तवाच्या व्यक्ती तसेच मोठया प्रमाणात जनसमुदाय उपस्थित राहणार आहे. त्या अनुषंगाने ठाणे आयुक्तालयाच्या हद्दीतुन नवी मुंबईकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड–अवजड (६ चाकी व १० चाकी) मालवाहतुक करणाऱ्या वाहनांना ये–जा करण्यास व पार्कींग करण्यास सकाळी ०६:०० ते रात्रौ २३:०० वा.पावेतो मनाई करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणुन, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ ने अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे –

कासारवडवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत प्रवेश बंद –	१) मुंबई, वसई, विरार कडून घोडबंदर रोडच्या दिशेने ठाणे कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड – अवजड वाहनांना **गायमुख निरा केंद्र येथे 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
कळवा वाहतूक उप विभागाचे हद्दीत प्रवेश बंद –	१) बाळकुम – साकेत – नवीन कळवा ब्रिज वरुन कळवा नाका कडुन नियमा मार्गे नवी मुंबई कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **कळवा नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
	२) खारीगाव टोलनाका – गॅमन जंक्शन – पारसिक सर्कल – मुंब्रा बायपास मार्गे नवी मुंबई कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड – अवजड वाहनांना **पारसिक सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
मुंब्रा वाहतूक उप विभागाचे हद्दीत प्रवेश बंद –	१) पनवेल कडुन कल्याण फाटा शिळफाटा मार्गे महापे कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड – अवजड वाहनांना **शिळफाटा फाटा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
	२) कल्याण व ठाणे येथून दहिसर मोरी मार्गे पनवेल व नवी मुंबई कडे जाणाऱ्या सर्व जड – अवजड वाहनांना मुंब्रा वाहतूक उप विभागाच्या हद्दीत **दहिसर मोरी** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
	३) ठाणे कडुन महापे नवी मुंबई कडे जाणाऱ्या सर्व जड – अवजड वाहनांना **पुजा पंजाब हॉटेल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
कोनगाव वाहतूक उप विभागाचे हद्दीत प्रवेश बंद –	१) भिवंडी शहरातील जे.एन.पी.टी. नवी मुंबई कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड – अवजड वाहनांना **रांजनोली नाका येथे भिवंडी कल्याण रोडवर 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
	२) ठाणे ग्रामीण सोनाळे गाव नाशिक मार्गे जे.एन.पी.टी. नवी मुंबई कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **बासुरी हॉटेल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
नारपोली वाहतूक उप विभागाचे हद्दीत प्रवेश बंद –	१) गुजरात कडून घोडबंदर रोडच्या दिशेने ठाणे कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड – अवजड वाहनांना **७२ गाळा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
कल्याण वाहतूक उप विभागाचे हद्दीत प्रवेश बंद –	१) ठाणे ग्रामीण, बापगाव कडुन जे.एन.पी.टी. नवी मुंबई कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड– अवजड वाहनांना **गांधारी नाका** येथे पडघा कल्याण रोडवर **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
	२) कल्याण शहरातील जे.एन.पी.टी. नवी मुंबई कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड– अवजड वाहनांना **पत्रीपुल** येथे कल्याण – शिळफाटा रोडवर **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

Scanned with OKEN Scanner

कोळशेवाडी वाहतूक उप विभागाचे हददीत प्रवेश बंद –	१) बदलापुर अंबरनाथ कडुन बदलापुर पाईपलाईन रोडने तसेच काटाई/बदलापुर नौक कडुन तळोजा बायपास रोडने नवी मुंबई कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड– अवजड वाहनांना **खोणी निर्सग नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

सदर अधिसूचना दिनांक २८/०२/२०२६ व दिनांक ०१/०३/२०२६ रोजी सकाळी ०६:०० ते रात्रौ २३:०० वा. पावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनास लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत मा. सविनय सादर

जिल्हाधिकारी, ठाणे, पालघर व रायगड जिल्हा.
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था), मुंबई.
अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस आयुक्त, मुंबई, ठाणे शहर, नवी मुंबई, मिरा–भाईंदर वसई–विरार.
विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई.

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी,

पोलीस सह आयुक्त, वाहतूक विभाग, मुंबई.
अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग/पश्चिम प्रादेशिक विभाग, कल्याण व ठाणे,
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण/पालघर/महामार्ग पोलीस.
पोलीस अधीक्षक, रस्ता सुरक्षा महामार्ग, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे, नवी मुंबई, मिरा–भाईंदर वसई–विरार.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – १ ठाणे, परिमंडळ – २ भिवंडी, परिमंडळ – ३ कल्याण,
परिमंडळ – ४ उल्हासनगर, परिमंडळ – ५ वागळे इस्टेट.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे/मुंबई/मिरा भाईंदर.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे.
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे.
चिंचोटी वाहतूक उप विभाग, चिंचोटी.

प्रत :– आयुक्त ठाणे, भिवंडी निजामपूर शहर, कल्याण डोंबिवली व उल्हासनगर महानगरपालिका.
मुख्याधिकारी, अंबरनाथ व कुळगाव बदलापूर नगर परिषद.
प्रत :– मुख्य व्यवस्थापक (वाहतूक), जे.एन.पी.टी. न्हावाशेवा, नवी मुंबई.
प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर.
२/– सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी.
प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना निर्गमित करण्यात आले बाबत नोटीस मध्ये प्रसिध्दीसाठी.
प्रत :– सर्व संबंधित वाहतूक संघटना.

Scanned with OKEN Scanner